स.फौ.ख.नं.३५१/२०२२

निशाणी क्र. १२ लगत

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव - अनिल विश्वनाथ गायकवाड,**

वय - ५० वर्षे, व्यवसाय – वाहन चालक,

रा. राजेगाव, ता.दौंड, जि.पुणे

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस.भांडारकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु-</u>**

१. घटना दि.२०/११/२०२१ रोजी सकाळी ८ वाजता घडली. मी घरी असताना चेतन बोरा नावाच्या आमच्या ओळखीच्या व्यक्तीने फोन करुन मला सांगितले की, माझी मुलगी अनुष्का हिचा पुणे-सोलापूर महामार्गावर संगम वाईन्स समोर अपघात झाला आहे. मी घटनास्थळी गेलो व अनुष्काला सरकारी दवाखान्यात दाखल केले. त्यावेळी डॉक्टरांनी तिला मयत घोषित केले.

२. क्रेटा गाडी नं.एम.एच./१४/जे.एम./९५०६ ही पुणेकडून सोलापूरकडे निघाली होती. माझी मुलगी रस्ता क्रॉस करत असताना त्या गाडीने तिला समोरुन धडक दिली. मला ही बाब घटनास्थळी उपस्थित असलेल्या लोकांनी सांगितली. क्रेटा गाडी चालकाचे नाव मंदार गोपाळ दामले असल्याचे मला पोलिस ठाणेत समजले. त्यावेळी ते पोलिस ठाणेत हजर होते. सदरचा अपघात हा क्रेटा गाडीच्या जास्त स्पीडमध्ये आल्यामुळे घडला. मी क्रेटा गाडी चालकाविरुद्ध पोलिस ठाणेत दाखल केली. मला आता तक्रार व प्रथम खबर अहवाल दाखविले. त्या दोन्हीवर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तक्रारीला **<u>निशाणी १९</u>** व प्रथम खबर अहवालाला **<u>निशाणी २०</u>** देण्यात येते. क्रेटा गाडीचालक आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस.एन.जगताप यांच्यामार्फत शपथेवर सुरु :-</u>**

३. हे खरे की, माझी पत्नी योगिता ही चेतन बोरा यांच्या कापड दुकानात कामाला आहे. हे खरे की, चेतन बोरा यांचे कापड दुकान महामार्गापासून आतील बाजूस १-२ फर्लांगावर आहे. हे खरे की, अपघात घडला तो महामार्ग चार पदरी आहे. हे खरे की, तो महामार्ग पुणे-सोलापूर ते हैद्राबादपर्यंत आहे. हे खरे की, त्या महामार्गावर सेकंदाला गाड्या जातात.

४. हे खरे की, मी डायनॅमिक्स डेअरीच्या दुधाच्या टॅंकरवर कामाला आहे. हे खरे की, त्या महामार्गावर रस्ता दुभाजक असुन तेथे झाडे लावली आहेत. हे खरे की, त्या रस्त्यावरुन पादचारीला जायचे असल्यास रस्त्यावर पांढरे पट्टे ओढलेले असतात. हे खरे की, त्या रस्त्याच्या डाव्या व उजव्या बाजूस बरीच दुकाने आहेत. हे खरे की, सकाळी ८ च्या सुमारास त्या रस्त्यावरील हॉटेल व दुकानात बरीच गर्दी असते. हे खरे की, संगम वाईन्सला लागून अनेक हॉटेल व दुकाने आहेत.

५. मी अपघात झाल्याचे कळल्यानंतर अर्ध्या तासात घटनास्थळी पाहोचलो. हे खरे की, मी तेथे गेल्यावर मुलीला उचलून दवाखान्यात साधारण ९ पर्यंत नेले. हे खरे की, त्या दिवशी शवविच्छेदन करुन साधारण १२.३० वाजता माझ्या मुलीला माझ्या ताब्यात दिले.

६. हे खरे की, मी पोलिस ठाणेत गेल्यावर आरोपी व त्याची गाडी पोलिस ठाण्यात होती. हे खरे की, त्यावेळी मला गाडीचा नंबर व आरोपीचे नाव पोलिसांकडून समजले.

७. हे खरे की, मला कोणत्या लोकांनी क्रेटा गाडी भरधाव वेगात आली असे सांगितले त्यांची नावे सांगता येणार नाहीत. हे खरे की, त्या गाडीचा वेग किती होता ते मला सांगितलेले नाही.

८. हे खरे की, माझी मुलगी जो रस्ता क्रॉस करुन आली तेथे पांढरे पट्टे नव्हते. हे खरे नाही की, माझ्या मुलीला शाळेत जायची घाई असल्याने ती झाडामागून अचानक आली व टेम्पोला धडकली. हे खरे नाही की, धडकल्यानंतर ती पुढे येऊन आरोपीच्या गाडीपुढे पडली. हे खरे नाही की, त्यामुळे तेथील लोकांचा गैरसमज झाला की आरोपीच्या गाडीमुळे अपघात झाला. हे खरे नाही की, धडक दिलेला टेम्पो तेथुन निघुन गेला. हे खरे नाही की, तेथे जमलेल्या लोकांनी गाडी व चालक यांना पोलिस ठाणेत नेले.

**९.** हे खरे की, मी घटना प्रत्यक्ष पाहिली नाही. हे खरे नाही की, आरोपीच्या गाडीने अपघात झाला नसुन टेम्पोने झाला.

**१०.** हे खरे की, आरोपीच्या गाडीचा विमा असल्याचे मला आरोपीने सांगितले. हे खरे की, त्याकरिता मी बारामती न्यायालयात १० लाखाचा क्लेम केला आहे. पोलिसांनी मला नंतर बोलावून सह्या वगैरे घेतल्या नाहीत. हे खरे नाही की, आरोपीच्या गाडीने धडक दिल्याने अपघात झाल्याचे खोटे सांगतो. हे खरे नाही की, अपघात विमा मिळावा म्हणून खोटी केस केली आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.07.30 17:59:21 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**
**दि.३०/०७/२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**